# गणेशोत्सव काळातील निर्माल्य संकलन : कोविड-१९ या महाभयंकर परिस्थिती बोदवड महविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा सामाजिक उपक्रम

गणेशोत्सवात दुर्वा, फुले, नाग्वेलीचे पाने, केळीचे पाने व झाडे यांना अन्यासाधारण महत्व असते. यांच्या मुळे निर्माण होणारे पत्री व फुलांचे निर्माल्या ओलसर असल्याने पावसाळ्याच्या दिवसात लवकर सडून त्यात बारीक किडे –चिलटे यांचा प्रादुर्भाव होतो. काही जण घरात साठवून ठेवलेले पण  सडलेले – कुजलेले निर्माल्य घराबाहेर किवा उकिरड्यावर फेकतातव भटकी जनावरे इतरत्र पसरवितात आणि त्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता असते. तर काही जण हे सडलेले - कुजलेले निर्माल्य मोठ्या प्रमाणात गणपती बरोबर पाण्यातच विसर्जित करतात. त्यामुळे पाणी किती प्रदूषित होत असेल याचा विचार न केलेला बारा. हेच पाणी शेवटी समुद्रात मिसळते व दुषित होते. पर्यावरणाची ही दुषित होणारी, बिघडत जाणारी साखळी शेवटी आपल्यालाच घातक आहे. तसेच निर्माल्याचे पवित्र राखले गेले पाहिजेत. हाच उदेश्य डोळ्यासमोर ठेऊन बोदवड येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल बारी यांनी निर्माल्य संकलन करण्यचा सामाजिक उपक्रम हाती घेण्यासाठी स्वयंसेवकांना सोशल मिडिया द्वारे आवाहन केले. त्यांच्या आवाहानाला महविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रम अधिकारी व सर्व स्वयंसेवकांनी उस्पुर्थपणे सहभाग घेऊन प्रतिसाद दिला.

महविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रम अधिकारी व सर्व स्वयंसेवकांनी निर्धार करून गणेश उत्सव काळात २२ ऑगस्ट ते ०१ सेप्टेंबर २०२०पर्यंत दहा दिवसात आप-आपल्या गावातील सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ व घरोघरी जाऊन तसेच विसर्जन स्थळावरील निर्माल्य संकलीत केले. महाविद्यालयाचे प्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे अध्यक्ष प्राध्यापक अरविंद चौधरी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल बारी व सर्व स्वयंसेवक यांच्या समवेत संकलीत केलेले हे निर्माल्य महाविद्यालय परिसरात त्याचे विघटन केले व निर्माल्याचे पावित्र्य राखण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमाचे आयोजन करत असतांना कोरोणा विषाणू (कोविड-१९) संसर्ग पार्श्वभूमी विचारात घेता साथरोग प्रतिबंधक नियमांचे व वेळेवेळी शासन, विद्यापीठ व स्थानिक प्रशासन यांचे निर्देश पाळून उपक्रम राबविण्यात आल्याचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांनी सांगितले.

या उपक्रमाचे आयोजने महाविद्यालयाचे प्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे अध्यक्ष प्राध्यापक अरविंद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या उपक्रमाच्या यशस्वीते साठी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य प्रा. डी. एस. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल बारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. माधव वराडे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रत्ना जावारास, डॉ. ईश्वर म्हसलेकर, डॉ. वंदना बडगुजर यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयसेवक गायत्री मराठे, प्रियांका मावरे, अजमल पवार , अविनाश पांडव, गौरव अटक, आदित्य माळी व इतर संवसेवक यांनी उपक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी सहकार्य केले. सदर उपक्रमाचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष श्री. मिठूलालाजी आग्रवाल, उप-अध्यक्ष श्री. अजयाजी जैन, सचिव श्री. विकासजी कोटेचा व सर्व संस्था चालकांनी केले. असे प्रसिद्धी प्रमुख श्री. जितेंद्र शर्मा यांनी कळविले आहे.

तरुणांमधील उत्साह व चैतन्य विधायक मार्गाने वापरले जावे म्हणून सार्वजनिक गणेशोत्सववासारख्या उत्सवाची गरज आहेच. पण या सगळ्या गोष्टीमुळे पर्यावरणाची अपरिमित हानी होत आहे; ही बाब दुर्लक्ष करण्यासारखी निश्चित नाही. हे प्रदूषण कोणकोणत्या मार्गांनी होते व ते कसे टाळता येईल, त्याविषयी जनजागृती करण्याचा एक प्रयोग - प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी

कोविड-१९ या महाभयंकर परिस्थिती सुद्धा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व स्वयंसेवकांनी निर्माल्य संकलन करून त्याचे विघटन केले व पर्यावरणाची ही दुषित होणारी, बिघडत जाणारी साखळी तोडण्याचा हा छोटासा प्रयत्न केला. तसेच निर्माल्याचे पावित्र्य राखून सामाजिक बांधिलकी सुद्धा जपली. - डॉ. अनिल बारी, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी

